शुक्रवार दि. १० जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# नगरसेवकांच्या नातेवाईकांना महापालिकेत नो एन्ट्री

## मुख्यालय, प्रभाग कार्यालये व विकासकामांच्या ठिकाणी अनधिकृत वावर रोखण्याचे आयुक्तांचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या कामकाजात नगरसेवक व नगरसेविका यांच्या नातेवाईकांकडून होत असलेल्या कथित हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठी आयुक्त अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांनी महत्त्वपूर्ण कार्यालयीन परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाद्वारे महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये तसेच विविध विकासकामांच्या ठिकाणी नगरसेवकांच्या नातेवाईकांचा अनधिकृत वावर व हस्तक्षेप रोखण्याचे स्पष्ट निर्देश सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत.




परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे की, जालना महानगरपालिका क्षेत्रातील जनतेने निवडून दिलेले अधिकृत नगरसेवक व नगरसेविका यांनाच महापालिकेच्या कामकाजात सहभाग घेण्याचा तसेच प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत आपले मत मांडण्याचा कायदेशीर अधिकार आहे. या अधिकाराचा इतर कोणालाही वापर करता येत नाही.

मात्र, काही नगरसेवकांचे पती, पत्नी, वडील, मुले, भाऊ किंवा इतर नातेवाईक महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये तसेच विविध विकासकामांच्या ठिकाणी नियमित वावर करून प्रशासकीय कामांमध्ये हस्तक्षेप करत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय काही व्यक्ती स्वतः ला नगरसेवक असल्याचा भास निर्माण करणे, सामाजिक माध्यमांवर तसेच इतर सार्वजनिक व्यासपीठांवर नगरसेवक म्हणून उल्लेख करणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांना नगरसेवक असल्याचे सांगून दूरध्वनीद्वारे सूचना देणे, महापालिकेच्या कार्यालयांना नगरसेवकांच्या अधिकारात भेटी देण्याचा प्रयत्न करणे तसेच खासगी कार्यालयांमध्येही नगरसेवक म्हणून स्वतःची ओळख सांगणे, अशा प्रकारच्या बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

महानगरपालिका प्रशासनाने अशा प्रकारांना गंभीर स्वरूपाचे मानले असून, यामुळे महापालिकेची प्रतिमा मलिन होण्याची तसेच संबंधितांवर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता असल्याचे नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, निवडून आलेल्या नगरसेवक व नगरसेविकांना आवश्यक तो सन्मान द्यावा. मात्र त्यांच्या नातेवाईकांना कोणत्याही परिस्थितीत दैनंदिन प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करू देऊ नये. त्यांच्या कोणत्याही मौखिक किंवा लेखी सूचनांचे पालन करू नये तसेच त्यांच्या दबावाखाली येऊन कायद्याने किंवा नियमांनुसार अनुज्ञेय नसलेली कोणतीही कामे करू नयेत.
तथापि, संबंधित नातेवाईक अथवा अन्य व्यक्ती सामान्य नागरिक म्हणून कार्यालयात आल्यास त्यांच्या वैध व अधिकृत कामांची पूर्तता नियमानुसार करण्यात यावी, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेतील प्रशासनिक कामकाज अधिक पारदर्शक, नियमबद्ध आणि लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या अधिकारांची स्पष्ट विभागणी राखण्याच्या दृष्टीने आयुक्त अंजली शर्मा यांनी जारी केलेले हे परिपत्रक महत्त्वाचे मानले जात असून, आगामी काळात या निर्देशांची अंमलबजावणी कशा पद्धतीने केली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आ.अर्जुन खोतकरांची विधानसभेत मागणी शेतकऱ्यांना झाडे लावण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन द्या

### *कार्बन टॅक्सचा निधी शेतकऱ्यांसाठी वापरण्याची सूचना; वनमंत्री गणेश नाईक यांचे सकारात्मक आश्वासन*

**जालना । प्रतिनिधी**

राज्यात पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवडीवर मोठ्या प्रमाणात भर दिला जात असला, तरी लागवड केलेल्या झाडांच्या संवर्धनासाठी शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देण्याची गरज असल्याची जोरदार मागणी शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत केली. या मागणीची दखल घेत वनमंत्री गणेश नाईक यांनी शासन स्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.



मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर बोलताना आमदार खोतकर म्हणाले की, राज्य सरकार दरवर्षी कोट्यवधी झाडे लावण्याचे उद्दिष्ट जाहीर करते. मात्र, प्रत्यक्षात त्यापैकी किती झाडे जिवंत राहतात, याचा गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. केवळ लागवडीच्या आकड्यांवर भर न देता झाडांचे संगोपन आणि दीर्घकालीन संवर्धन अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
यावेळी त्यांनी सरकारसमोर एक महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडला. राज्य सरकार कार्बन टॅक्सच्या माध्यमातून महसूल जमा करते. या निधीचा वापर शेतकऱ्यांना वृक्षलागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी करता येईल. शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर किंवा मोकळ्या जागेत झाडे लावल्यास त्यासाठी लागणारा खर्च वन विभागामार्फत देण्यात यावा. तसेच जिवंत राहिलेल्या प्रत्येक झाडामागे दरवर्षी ठराविक आर्थिक प्रोत्साहन दिल्यास राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
आमदार खोतकर म्हणाले की, वन विभाग एका झाडावर जो खर्च करतो, तोच निधी थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्यास केवळ शासनाचे वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही, तर त्यापेक्षाही अधिक प्रमाणात झाडांची लागवड आणि संवर्धन होईल. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच शेतकऱ्यांनाही अतिरिक्त आर्थिक आधार मिळेल.
हवामान बदल, वाढते तापमान आणि पर्यावरणीय असंतुलन ही गंभीर आव्हाने लक्षात घेता आता दूरदृष्टीचे निर्णय घेण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरण संरक्षण आणि शेतकरी हित या दोन्हींचा समतोल साधण्यासाठी शेतकऱ्यांना झाडे लावण्यासाठी आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. आमदार खोतकर यांनी मांडलेल्या या प्रस्तावाची सभागृहातील अनेक सदस्यांनी दखल घेतली. त्यानंतर वनमंत्री गणेश नाईक यांनी या मागणीचा शासन स्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याने शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींमध्ये अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

# परखना मत, परखने से कोई अपना नहीं रहता...

## शेरोशायरीत दिलासा, कृतीत विश्वास...कैलास गोरंट्याल यांचा कॉलनीवासीयांना शब्द

### सोरटी नगर, मयुरी पार्क, कृष्णबन कॉलनीत पाहणी; रस्ता, पाणी, वीज, स्वच्छता प्रश्नांवर तातडीच्या कामांना प्रारंभ; आयुक्त अंजली शर्मा यांच्या समक्षच निर्णय

**जालना - प्रतिनिधी**

राजकारणात अनेक आश्वासने दिली जातात. मात्र काही नेते थेट नागरिकांच्या दारात जाऊन त्यांच्या डोळ्यातील वेदना वाचण्याचा प्रयत्न करतात. जालना शहरातील छत्रपती संभाजीनगर मार्गावरील महिंद्रा शोरूमलगत असलेल्या सोरटी नगर, मयुरी पार्क, कृष्णबन कॉलनीसह परिसरातील नागरिकांच्या नागरी समस्यांनी अक्षरशः टोक गाठल्यानंतर गुरुवारी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह प्रत्यक्ष पाहणी केली. पावसामुळे चिखलमय झालेल्या रस्त्यांवरून पायी चालत त्यांनी नागरिकांच्या अडचणी ऐकून घेतल्या आणि अनेक प्रश्नांवर जागेवरच निर्णय घेत संबंधित यंत्रणेला कामाला लावले.





भेटीदरम्यान नागरिकांनी रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता, घंटागाडी, रस्त्यावरील दिवे आणि सिमेंट रस्त्याची मागणी मांडली. त्यावर गोरंट्याल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, काल आमचे गुड्डूभाई यांचा फोन आला. कॉलनीतील लोक आंदोलन करत असल्याचे त्यांनी सांगितले. मी लगेच विचारले, नेमका प्रश्न काय? त्यांनी रस्त्याची दयनीय अवस्था सांगितली आणि आज मी स्वतः येथे आलो. गोरंट्याल म्हणाले, माझ्या चाळीस वर्षांच्या राजकारणात एखादा आयएएस अधिकारी एखाद्या वॉर्डात स्वतः येऊन नागरिकांचे प्रश्न ऐकत असल्याचे मी पहिल्यांदाच पाहत आहे. पावसाळा संपेपर्यंत हा रस्ता तात्पुरता वाहतुकीयोग्य केला जाईल. त्यानंतर कायमस्वरूपी सिमेंट रस्त्यासाठी निधी मिळवू. जुना सात कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे आहे. तो मंजूर झाला तर उत्तम अन्यथा डीपीडीसी निधीतून दोन कोटी रुपयांपर्यंतचा सिमेंट रस्ता कोणत्याही परिस्थितीत करून देऊ. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही त्यांनी आयुक्त अंजली शर्मा यांच्या उपस्थितीतच मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. तत्काळ अधिकाऱ्यांना बोलावून पाईपलाईन जोडण्याचे काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.

त्याचबरोबर घंटागाडी नियमित सुरू करणे, रस्त्यावरील दिवे बसविणे आणि महावितरणशी समन्वय साधून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देशही देण्यात आले. पावसामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था पाहून गोरंट्याल यांनी स्वखर्चातून यंत्रसामग्री उपलब्ध करून तातडीने रस्ता दुरुस्तीला सुरुवात केली. पावसाळ्यात नागरिकांना चिखलातून चालावे लागू नये, हीच आमची प्राथमिकता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी बोलताना त्यांनी या परिसरातील नागरिक शंभर टक्के कर भरणारे असल्याचे नमूद करत, कर वेळेवर भरूनही सुविधा मिळत नसतील, तर तो नागरिकांवर अन्याय आहे, असे स्पष्ट मत व्यक्त केले. भेटीच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी आग्रह धरताच गोरंट्याल यांनी आपल्या खास शैलीत शेर सादर केला.

**परखना मत, परखने से कोई अपना नहीं रहता,**
**आईना चाहे जैसा भी हो, चेहरा हमेशा एक-सा नहीं रहता।**
**मोहब्बत वो खुशबू है, जो हर पल साथ रहती है,**
**कोई इंसान तन्हा रहकर भी, हमेशा तन्हा नहीं रहता।**

**शेर संपताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले आणि समस्यांच्या निराकरणाला सुरुवात झाल्याने समाधान व्यक्त केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेवक गुड्डू यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

### निवासी भागात टायर कारखाना खपवून घेतला जाणार नाही : आयुक्त अंजली शर्मा

सोरटी नगर परिसरातील पाहणीदरम्यान नागरिकांनी निवासी भागात सुरू असलेल्या टायर कारखान्यामुळे आग, धूर आणि अपघाताचा धोका निर्माण होत असल्याची तक्रार आयुक्त अंजली शर्मा यांच्या निदर्शनास आणून दिली. तक्रारीची गंभीर दखल घेत आयुक्तांनी जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईचे निर्देश दिले. हा परिसर निवासी वापरासाठी आरक्षित असल्याने निवासी भागात टायर कारखाना खपवून घेतला जाणार असल्याचे आयुक्त अंजली शर्मा म्हटले असून तत्काळ नोटीस बजावली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही अनधिकृत व्यवसायाला महानगरपालिका पाठीशी घालणार नाही. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करून कारखाना हटविण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत करत प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### शंभर टक्के कर, मग सुविधा का नाही? स्वच्छता, पाणी आणि दिव्यांबाबत आयुक्तांचा शब्द

भेटीदरम्यान नागरिकांनी नियमित साफसफाई, घंटागाडी, पिण्याचे पाणी आणि रस्त्यावरील दिव्यांचा प्रश्न आक्रमकपणे मांडला. त्यावर आयुक्त अंजली शर्मा यांनी या परिसरातील नागरिक नियमितपणे मालमत्ता कर भरत असल्याची नोंद घेत, सुविधा देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. घंटागाडी नियमित सुरू करण्याचे, स्वच्छता मोहिमेला गती देण्याचे आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. रस्त्यावरील बंद दिवे दुरुस्त करून आवश्यक ठिकाणी नवीन दिवे बसविण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. करदात्यांना मूलभूत सुविधा मिळाल्याच पाहिजेत. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे, असे सांगत त्यांनी नागरिकांना समस्या थेट महानगरपालिकेकडे मांडण्याचे आवाहन केले.

### .नगरसेवक गुड्डूभाई यांच्यासह लोकप्रतिनिधींचे सातत्यपूर्ण प्रयत्न

सोरटी नगर, मयुरी पार्क आणि कृष्णवन कॉलनीतील नागरिकांच्या मूलभूत समस्यांसाठी नगरसेवक इमरान खान गुड्डूभाई यांनी सातत्याने पाठपुरावा केला. रस्ते, पाणी, स्वच्छता, वीज आणि इतर नागरी सुविधांच्या प्रश्नांबाबत त्यांनी रहिवाशांसोबत प्रशासनाशी वारंवार संपर्क साधून प्रत्यक्ष पाहणीसाठी माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांना परिसरात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या कामात इतर नगरसेवकांनीही सहकार्य करत नागरिकांच्या मागण्या प्रशासनापर्यंत पोहोचविल्या. लोकप्रतिनिधींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### बालकांसाठी अंगणवाडी उभारण्यासाठी प्रयत्न; संगीताताई गोरंट्याल यांची ग्वाही

सोरटी नगर, मयुरी पार्क आणि कृष्णवन कॉलनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना माजी नगराध्यक्ष सौ. संगीताताई गोरंट्याल यांनी लहान मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी अंगणवाडीची आवश्यकता अधोरेखित केली. परिसरात वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत अंगणवाडीची सुविधा नसल्याने पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब त्यांनी लक्षात घेतली. हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी संबंधित विभागाशी पाठपुरावा करून या परिसरात अंगणवाडी सुरू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बालकांना शिक्षण, पोषण आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासनही संगीताताई गोरंट्याल यांनी नागरिकांना दिले.

# संपादकीय....

## करांचा वाढता बोजा आणि व्यापाऱ्यांची चिंता; समतोल धोरणाची गरज

जालना येथे झालेल्या मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या बैठकीत व्यापारी वर्गाने व्यक्त केलेली नाराजी ही केवळ एका संघटनेची भूमिका नसून, राज्यातील अनेक लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योग-व्यवसायांसमोरील वाढत्या आर्थिक दबावाचे प्रतिबिंब मानावे लागेल. आस्थापना कर, सोलार ग्रीड सपोर्टिंग चार्ज आणि व्यवसाय कर (प्रोफेशनल टॅक्स) यांसारख्या मुद्द्यांवर व्यापाऱ्यांनी उपस्थित केलेले प्रश्न शासनाने गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. सरकारच्या महसुलासाठी कर हा महत्त्वाचा स्रोत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठीही नवीन उत्पन्न स्रोतांची आवश्यकता असते. मात्र, कोणताही नवीन कर लावताना त्याचा उद्योग-व्यवसायांवर होणारा परिणाम, स्थानिक बाजारपेठेची क्षमता आणि आर्थिक परिस्थिती यांचा सखोल अभ्यास होणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा करांचा वाढता भार गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि व्यापाराच्या वाढीवर विपरीत परिणाम करू शकतो. सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे धोरण हे पर्यावरण आणि ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा वेळी सौरऊर्जा वापरणाऱ्यांवर अतिरिक्त ग्रीड सपोर्टिंग चार्ज आकारण्याबाबत उद्योग-व्यवसाय क्षेत्रात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. दुसरीकडे, वीज वितरण व्यवस्था टिकवण्यासाठी आणि ग्रीडच्या देखभालीसाठी काही खर्च अपरिहार्य असल्याचा शासनाचा दृष्टिकोनही असू शकतो. त्यामुळे या विषयावर शासन, महावितरण आणि व्यापारी संघटनांमध्ये पारदर्शक संवाद होणे आवश्यक आहे. वन नेशन, वन टॅक्स या जीएसटीच्या संकल्पनेनंतरही विविध प्रकारचे कर कायम असल्याची व्यापाऱ्यांची भावना लक्षात घेण्यासारखी आहे. करप्रणाली सुलभ, पारदर्शक आणि पूर्वानुमान करता येईल अशी असणे हे उद्योगस्नेही वातावरणासाठी आवश्यक आहे. अनेक स्तरांवरील कर आणि शुल्कांमुळे अनुपालनाचा खर्च वाढत असल्याची तक्रार सातत्याने पुढे येत आहे. त्याचवेळी व्यापारी संघटनांनीही केवळ विरोधाची भूमिका न घेता पर्यायी महसूल उपाय, कररचनेतील सुधारणा आणि व्यवहार्य पर्याय शासनासमोर मांडणे गरजेचे आहे. संवाद, अभ्यासपूर्ण मांडणी आणि पुराव्यांवर आधारित सूचना यांमधूनच दीर्घकालीन तोडगा निघू शकतो. धर्माबाद येथे होणाऱ्या व्यापार परिषदेत या विषयांवर व्यापक चर्चा होणार आहे. या चर्चेतून व्यापारी हित आणि सार्वजनिक हित यांचा समतोल साधणाऱ्या शिफारशी पुढे आल्यास त्याचा लाभ केवळ व्यापारी वर्गालाच नव्हे, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही होईल. करप्रणाली ही विकासाला चालना देणारी असावी, विकासाला अडथळा ठरणारी नव्हेयाच तत्त्वावर शासन आणि व्यापारी संघटनांनी पुढे जाण्याची गरज आहे.

# लिट्ल मास्टरला वाढदिवसाच्या शुभेच्छा !

क्रिकेट हा आज सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. भारत हा आज क्रिकेटमधील दादा संघ आहे मात्र सत्तरच्या दशकापर्यंत भारत हा क्रिकेटमधील लिंबूटिंबू संघ समजला जात होता. त्या काळी फक्त कसोटी क्रिकेट खेळले जायचे. भारताने कसोटी अनिर्णित राखली तरी ती मोठी बातमी असायची. भारताने कसोटीत विजय मिळवला ही बातमी तर दुर्मिळ असायची. भारताला जो विजय मिळायचा तो अर्थात भारतातच मिळायचा. भारताबाहेर परदेशात विजय मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज हे त्या काळातील दादा संघ. त्यांना त्यांच्या देशात जाऊन हरवायचे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. अशीच अशक्यप्राय गोष्ट भारताने शक्य केली ती १९७१ साली. १९७१ साली भारताचा संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला होता. त्या संघात एक छोट्या चणीचा मराठी मुलगा भारतीय संघात प्रथमच खेळत होता. त्याची ती पहिलीच कसोटी मालिका. समोर वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांचा तोफखाना. हा छोट्या चणीचा मुलगा सलामीला खेळायला गेला. नुसताच खेळायला गेला नाही तर तो खेळला, असा खेळला की त्याने आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत विश्वविक्रम केला. आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत ते ही वेस्ट इंडिजच्या तोफखान्यासमोर त्याने विक्रमी ७७४ धावा काढल्या. त्याचा हा विश्वविक्रम अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही हे विशेष. त्याच्या या विक्रमी फलंदाजीने भारताने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये हरवले आणि या छोट्या चणीच्या मराठी मुलाची दखल जगाने घेतली. आपल्या पहिल्याच मालिकेत विक्रमी धावा काढणारा हा मुलगा होता सुनील मनोहर गावस्कर. हो तोच सुनील गावस्कर जो पुढे जाऊन भारतीय संघाचा आधारस्तंभ बनला. ज्याने अनेक विश्वविक्रमांना गवसणी घातली. ज्याने डॉन ब्रॅडमन यांच्या २९ शतकांच्या शतकी खेळीचा विक्रम मोडून ३४ शतके काढली. कसोटी क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा पार करणारा जो पहिला खेळाडू ठरला. ज्याने आपल्या देशाला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले त्याच सुनील गावस्कर यांचा आज ७७ वा वाढदिवस. १० जुलै १९४९ रोजी मुंबईत जन्मलेले सुनील गावस्कर हे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम आघाडीचे फलंदाज म्हणून ओळखले जातात. १९७१ ते १९८७ असे सतरा वर्ष त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले या दरम्यान त्यांनी १२५ कसोटी सामन्यात ५१.१२ च्या सरासरीने १०,१२२ धावा काढल्या. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, न्यूझीलंड अशा सर्वच संघाविरुद्ध त्यांनी खोऱ्याने धावा काढल्या. त्या काळातील गोलंदाज आजच्या सारखे नव्हते. आग ओकणारे गोलंदाज होते. वेस्ट इंडीजचे अँडी रॉबर्ट्स, जोएल गार्नर, माल्कम मार्शल, मायकल होल्डींग, पॅट्रिक पॅटरसन, इंग्लंडचे बॉब विलिस, जॉन स्नो, इयान बॉथम, पाकिस्तानचे इम्रान खान, सरफराज खान, ऑस्ट्रेलियाचे जेफ थॉमसन, डेनिस लिली केवळ नाव घेतले तरी थरकाप उडतो. हे गोलंदाज नव्हते तर फलंदाजांचे कर्दनकाळ होते. त्यांच्या समोर धावा काढणे तर दूरच पण उभे राहणे देखील मुश्कील होते. अशा खुंखार गोलंदाजांसमोर सुनील गावस्कर खोऱ्याने धावा काढत असे ते त्यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या जोरावर. सुनील गावस्कर यांची गणना क्रिकेटच्या इतिहासात सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज अशी केली जाते. ते फलंदाजीस उतरत तेंव्हा पायाला पॅड आणि हातात ग्लोज एव्हढेच सुरक्षेचे साधने घालून. सुनील गावस्कर यांनी हेल्मेट कधीही वापरले नाही ते कायम डोक्यावर स्कल कॅप घालायचे. स्कल कॅप घालूनच त्यांनी त्या काळातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आणि खोऱ्याने धावा काढल्या. या दरम्यान त्यांना लिटल मास्टर पदवी मिळाली. आजही त्यांच्या नावापुढे लिटिल मास्टर असेच लिहिले जाते. या दरम्यान त्यांनी भारतीय संघाचे कर्णधारपदही सांभाळले. १९८३ चा विश्वचषक जिंकून देण्यातही त्यांचा मोलाचं वाटा होता. ते केवळ उत्कृष्ट फलंदाजच नव्हते तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकी होते. त्यांनी कसोटीत १०० हून अधिक झेल टिपले. यष्टिरक्षक सोडून कसोटीत १०० हून अधिक झेल घेणारा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला. कसोटीतील त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळे १९८० मध्ये त्यांना विस्डेन या क्रिकेटमधील प्रसिद्ध मासिका तर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन्□ रुईंस व वन डे वंडर ही तीन पुस्तके लिहिली. आज ते समालोचन आणि स्तंभलेखन करतात. आज त्यांचा ७७ वा वाढदिवस. सुनील गावस्कर यांना ७७ व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## चंदनझिरा परिसरातील नॅशनल नगरात मनपाची धडक कारवाई;अनधिकृत कत्तलखान्यावरील तीन शेड जमीनदोस्त

### आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण हटाव मोहीम; पाण्याचा हौद, दावणही हटविली

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेने अनधिकृत अतिक्रमणा विरोधातील कारवाई अधिक तीव्र करत गुरुवारी (दि. ९ जुलै) चंदनझिरा परिसरातील नॅशनल नगर येथे जनावरांची अनधिकृत कत्तल सुरू असल्याच्या माहितीवर धडक कारवाई केली. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाने संबंधित ठिकाणी उभारण्यात आलेले अनधिकृत शेड, पाण्याचा हौद आणि जनावरे बांधण्यासाठी उभारलेली दावण यासह सर्व बेकायदेशीर बांधकामे हटवून परिसर मोकळा केला.

महानगरपालिका प्रशासनाला नॅशनल नगर परिसरात अनधिकृतपणे जनावरांची कत्तल सुरू असल्याची माहिती प्राप्त होताच प्रशासनाने तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार अतिक्रमण विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोलिस बंदोबस्तात कारवाई करत संबंधित ठिकाणी उभारण्यात आलेले तीन अनधिकृत शेड जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले.

कारवाईदरम्यान जनावरांच्या कत्तलीसाठी वापरला जाणारा पाण्याचा हौद, जनावरे बांधण्यासाठी उभारलेली दावण तसेच इतर अनधिकृत संरचनाही हटविण्यात आल्या. त्यामुळे परिसरातील अनधिकृत कत्तलखान्याचा पूर्णपणे सफाया करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले. या मोहिमेसाठी एक जेसीबी, एक ट्रॅक्टर तसेच महानगरपालिकेचा मोठा कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला होता. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाचाही बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या सहकार्यामुळे कारवाई शांततेत आणि सुरळीत पार पडली. ही कारवाई उपायुक्त त्र्यंबक कांबळे आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या जिल्हाप्रमुखपदी संजय मिसाळ

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नामवंत पैलवान संजय मिसाळ यांची महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या जालना जिल्हा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे पैलवान संग्राम कांबळे यांच्या हस्ते पैलवान संजय मिसाळ यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.



पैलवान संजय मिसाळ यांनी १९९२ ते १९९६ या कालावधीत पुणे येथील गोकुळ वस्ताद तालीम येथे गुरुवर्य रुस्तुम ए हिंद पै.हरिश्चंद्र बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर सराव करत महाराष्ट्रातील अनेक नामांकित कुस्ती मैदानांमध्ये दमदार कामगिरी केली आणि महाराष्ट्र चॅम्पियन हा मानाचा किताब पटकावला.

आजही ते जालना जिल्ह्यात स्वखर्चाने दरवर्षी कुस्ती मैदानाचे आयोजन करतात. अनेक गरीब व होतकरू पैलवानांना आर्थिक व सर्वतोपरी मदत करून त्यांना पुढे आणण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. जालना जिल्ह्यात अधिकाधिक गुणवंत पैलवान घडावेत आणि कुस्तीची परंपरा अधिक बळकट व्हावी, यासाठी ते अविरत प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्र कुस्ती संघटनेला विश्वास आहे की, त्यांच्या अनुभव, नेतृत्व आणि कार्यतत्परतेमुळे जालना जिल्ह्यात कुस्ती चळवळीला नवी दिशा मिळेल. जालना जिल्ह्यात कुस्तीचा विकास, तालमींचे सक्षमीकरण आणि नवोदित पैलवानांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र कुस्ती संघटना नेहमीच त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे पैलवान संग्राम कांबळे यांनी व्यक्त केला आहे.

# गॅस गोडाऊन फोडून सिलेंडर चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

## जालना व परभणीतील दोन गुन्हे उघड; ६० एचपी गॅस सिलेंडरांसह ₹१.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील कुंभारपिंपळगाव येथील एचपी गॅस गोडाऊन फोडून ६० गॅस सिलेंडर चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन आरोपींना परभणी जिल्ह्यातील पाथरी येथून अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सुमारे ₹१,६६,९२० किंमतीचे ६० एचपी गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे जालना व परभणी जिल्ह्यातील सिलेंडर चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ जून २०२६ रोजी कुंभारपिंपळगाव (ता. घनसावंगी) येथील एचपी गॅस गोडाऊनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ३६ भरलेले व २४ रिकामे असे एकूण ६० घरगुती एचपी गॅस सिलेंडर चोरून नेले होते. याप्रकरणी गोडाऊन मालक गोपाल राधेश्याम लोया (वय ३९) यांनी घनसावंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार गुन्हा क्रमांक ३६०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३२४(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने तपासाची सूत्रे हाती घेतली.

तपासादरम्यान चोरीमध्ये राजेश लाला पवार (वय ३४) व गणेश प्रभू काळे (वय २६, दोघेही रा. इंदिरानगर, पाथरी, जि. परभणी) यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी पाथरी येथे सापळा रचून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी कुंभारपिंपळगाव येथील चोरीची कबुली देण्याबरोबरच २९ मार्च २०२६ रोजी परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील खवणे पिंप्री येथील इंडेन गॅस गोडाऊन फोडूनही सिलेंडर चोरी केल्याची कबुली दिली. त्यामुळे पाथरी पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक १५६/२०२६ देखील उघडकीस आला आहे.

या कारवाईत आरोपींकडून ३६ भरलेले आणि २४ रिकामे असे एकूण ६० घरगुती एचपी गॅस सिलेंडर, एकूण ₹१,६६,९२० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सध्या दोन्ही आरोपींना पुढील तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेसाठी घनसावंगी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, या टोळीने इतर ठिकाणीही अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (अंबड) सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे, सतीश श्रीवास आणि कैलास चेके यांनी संयुक्तपणे पार पाडली.

## गृहकर्ज पूर्व-बंद विवरणात दिरंगाई, पीएनबी हाऊसिंग फायनान्सला दंड!

**जालना - प्रतिनिधी**

थ्रिसूर येथील जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाने पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडला सेवेतील त्रुटीसाठी जबाबदार धरले आहे. गृहकर्ज पूर्व-बंद विवरण जारी करण्यास अनावश्यक विलंब केल्याबद्दल आणि या विलंबाच्या कालावधीसाठी व्याज आकारल्याबद्दल आयोगाने कंपनीला दंड ठोठावला आहे. आयोगाच्या मते, कंपनीच्या स्वतःच्या कृतीमुळे झालेल्या विलंबासाठी ग्राहकाकडून व्याज आकारणे हे सेवेतील त्रुटी आहे.

या प्रकरणात, तक्रारदार, श्री. सिजू राज ए. यांनी पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून गृहकर्ज घेतले होते. कर्जाच्या मुदतीदरम्यान, त्यांनी ०५ जानेवारी २०२३ रोजी पूर्व-बंद विवरणासाठी अर्ज केला आणि आवश्यक असलेले ८८५ रुपये शुल्क भरले. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, गृहनिर्माण वित्त कंपनीने २१ कामकाजाच्या दिवसांत हे विवरण जारी करणे अपेक्षित होते, परंतु स्थानिक शाखेतून वरिष्ठ व्यवस्थापनापर्यंत वारंवार पाठपुरावा करूनही कंपनीने ते केले नाही.

तक्रारदाराने असा आरोप केला की, शुल्क जमा करून ०७ जानेवारी २०२३ रोजी धनादेश वटवला गेला असतानाही, पूर्व-बंद विवरण २० फेब्रुवारी २०२३ रोजीच जारी करण्यात आले. या विलंबामुळे त्यांना १८ दिवसांच्या अतिरिक्त कालावधीसाठी ११.९७% दराने व्याज आकारण्यात आले, ज्यामुळे १८,३४२ रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडला. त्यांचे कर्ज बंद करण्यासाठी त्यांच्या खात्यात पुरेसा निधी उपलब्ध होता आणि हा विलंब केवळ वित्त कंपनीमुळेच झाला, असे त्यांनी म्हटले. कंपनीने असा युक्तिवाद केला की, खाते कायम ठेवण्यासाठी त्यांनी तक्रारदाराला ८.७५% कमी व्याजदराची ऑफर दिली होती आणि सुधारित अटींवर चर्चा सुरू होती. मात्र, तक्रारदाराने हे वाटाघाटी पूर्व-बंद विवरण रोखण्याचे किंवा अतिरिक्त व्याज आकारण्याचे समर्थन करू शकत नाहीत, असा दावा केला.

या तक्रारीवर सुनावणी करताना, आयोगाने निरीक्षण केले की तक्रारदाराने कर्जाच्या पूर्व-बंद विवरणासाठी योग्यरित्या अर्ज केला होता आणि आवश्यक शुल्क देखील भरले होते. असे असूनही, पीएनबी हाऊसिंग फायनान्स निर्धारित २१ कामकाजाच्या दिवसांत विवरण जारी करण्यात अयशस्वी ठरली. आयोगाने स्पष्ट केले की, कंपनीने कमी व्याजदरासाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला असला तरी, त्यामुळे पूर्व-बंद प्रक्रियेत विलंब करणे योग्य ठरत नाही. आयोगाने पुढे नमूद केले की, पीएनबी हाऊसिंग फायनान्सने स्वतःच्या व्यावसायिक हितासाठी कमी व्याजदराबाबत वाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला, परंतु अशा हितामुळे शुल्क भरल्यानंतर पूर्व-बंद विवरण मिळवण्याच्या तक्रारदाराच्या हक्कावर गदा येऊ शकत नाही. आयोगाने असा निष्कर्ष काढला की, केवळ वाटाघाटींमुळे कर्जाच्या पूर्व-बंद विवरणाच्या वैध आणि अस्तित्वात असलेल्या विनंतीला दुर्लक्षित करता येणार नाही. हा विलंब पूर्णपणे प्रतिपक्षाच्या चुकीमुळे झाल्यामुळे, विलंबित कालावधीसाठी व्याज आकारणे हे सेवेतील त्रुटी ठरते.

पान ४ वरुन...

### माजी आमदारांचे आरोप...

जनतेच्या हिताचे काम होत असल्यामुळे काहींना राजकीय पोटदुखी होत असेल, तर त्यासाठी आम्ही जबाबदार नाही. जनतेची कामे होऊ नयेत, विकासाच्या प्रश्नांवर अडथळे निर्माण व्हावेत आणि त्यातून राजकारण करता यावे, हा काहींचा उद्देश असल्याचे दिसून येते. मात्र अशा प्रकारच्या आरोपांमुळे सत्य बदलत नाही.

जालना मर्चंट बँकेतील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी यापुढेही आपण कटिबद्ध राहणार असून, प्रत्येक सभासद आणि ठेवीदाराला त्याच्या हक्काची रक्कम मिळेपर्यंत आपला पाठपुरावा सुरूच राहील, अशी ग्वाही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

तसेच, खरे तर बँकेत ज्यांच्या रक्कमा अडकल्या आहेत त्यांच्यामध्ये आता एकप्रकारे चांगली भावना निर्माण झाली आहे.जनतेला वस्तुस्थिती पूर्णपणे माहिती असून, केवळ प्रसिद्धीसाठी आणि दिशाभूल करण्याच्या उद्देशाने करण्यात येणाऱ्या अशा बिनबुडाच्या आरोपांना जनता कोणतीही किंमत देणार नाही, असा विश्वासही आमदार खोतकर यांनी व्यक्त केला.

### जवाहर नवोदय...

ते १०० मध्ये स्कॅन करून संकेतस्थळ ''...'', व ://.../ यावरून भरावेत. विद्यार्थ्यांचा जन्म हा दिनांक १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ च्या दरम्यानचा असावा.जिल्हाभरातील सर्व मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. जी. पवार यांनी केले आहे.

### जिल्हा वार्षिक...

आला. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी मित्तल यांनी सर्व विभाग प्रमुखांनी समन्वयाने काम करत शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार विकासकामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच उपलब्ध निधीचा शंभर टक्के विनियोग सुनिश्चित करावा आणि प्रलंबित प्रस्ताव व अहवाल विहित मुदतीत सादर करावेत, असे निर्देश दिले.

यावेळी बैठकीत विविध विभागांच्या योजनांची अंमलबजावणी, निधी खर्च, प्रलंबित कामे तसेच आगामी वर्षातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, नियोजन विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### मुरव्यमंत्री युवा...

करणे हा आहे. या योजनेअंतर्गतवरकड हॉस्पिटल, जालना या आस्थापनेने ६ प्रशिक्षणार्थ्यांनाप्रशिक्षणासाठी संधी उपलब्ध करून दिली असून, त्यांना नियुक्ती आदेशांचे वितरणवरकड हॉस्पिटलचे प्रतिनिधी श्री. गौतम खरातवश्री. विशाल येवले, परि. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, जालनायांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कौशल्य विकास क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या उत्कृष्ट उद्योजक, गुणवत्तापूर्ण कौशल्य प्रशिक्षण संस्था तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत युवकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या आस्थापनांचा गौरव करण्यात आला. सन्मानित संस्थांमध्येप्रियदर्शनी नागरी सहकारी बँक, जालना, समर्थ सहकारी नागरी बँक मर्या., जालना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वस्तीगृह, जालना, भारत फायनान्स, जालना, आकाशदीप इन्स्टिट्यूट, जालनाआदी संस्थांचा समावेश होता.

कार्यक्रमात मार्गदर्शन करतानाश्री. विशाल येवले, परि. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, जालनायांनी नियुक्ती प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करत प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त, प्रामाणिकपणा, वेळेचे नियोजन आणि समर्पित वृत्तीने कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच कौशल्य विकासासाठी सातत्याने सहकार्य करणाऱ्या उद्योजक, प्रशिक्षण संस्था व आस्थापनांचे आभार मानून भविष्यातही असेच सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. या कर्याक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अमोल परिहार व रविंद्र पाडमुख यांनी केले तर आभार दत्ता जाधव यांनी मानले.

या कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथील अमोल बोरकर, नितीन लोकडे, प्रदीप डोळे, कैलास काळे, विशाल जगरवाल, दीपक पालवे,वश्री. गणेश सुपारकर इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

### मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि पूरनियंत्रणावर भर

# १३ हजार कोटींचा एकात्मिक पूर नियंत्रण आराखडा केंद्र शासनाला सादर- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई - वृत्तसेवा**

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या (एमएमआर) सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने पायाभूत सुविधा, पूरनियंत्रण, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञान, जलसुरक्षा, वाहतूक व्यवस्था, आरोग्य सेवा आणि पारदर्शक प्रशासन यांचा समन्वय साधणारे व्यापक नियोजन हाती घेतले आहे. या माध्यमातून मुंबईला भविष्यातील जागतिक दर्जाचे, सुरक्षित आणि सक्षम महानगर म्हणून विकसित करण्यात येत आहे. तसेच मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १३ हजार कोटी रुपयांचा एकात्मिक पूरनियंत्रण आराखडा केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मुंबई आणि एमएमआर क्षेत्रावरील नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांने मांडलेल्या प्रस्तावाच्या चर्चेच्या उत्तरात दिली.

शहरातील ३७० पूरप्रवण ठिकाणी पावसाचे पाणी अवघ्या ३० मिनिटांत बाहेर काढण्याची व्यवस्था उभारली जाणार आहे. पूरनियंत्रणासाठी सध्या ५४७ पंप कार्यरत असून एमएमआरडीए, रेल्वे आणि इतर यंत्रणांसह एकूण ९९० पंप उपलब्ध आहेत. सहा मोठी आणि दहा मिनी पंपिंग स्टेशनही कार्यरत आहेत. यंदा अपेक्षित प्रमाणाच्या ११२ टक्के नालेसफाई करण्यात आली असून मिठी नदीतील ८३ टक्के गाळ काढण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यंदा मुंबईत अवघ्या सहा दिवसांत जुलै महिन्याच्या सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. सहा दिवसात कुलाबा येथे ८८२ मिमी आणि सांताक्रूझ येथे ९८८ मिमी पावसाची नोंद झाली. केवळ सहा दिवसांत वार्षिक पावसाच्या सुमारे ४२ टक्के पाऊस झाला. ताशी ५० ते ७५ किलोमीटर वेगाचे वारे आणि चार मीटरपेक्षा अधिक उंच भरतीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली. अशा परिस्थितीतही विविध यंत्रणांनी प्रभावी कामगिरी केली.

**नालेसफाईत एआय आधारित फसवणूक शोध प्रणाली**

नालेसफाईतील गैरव्यवहार रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित फसवणूक शोध प्रणाली लागू करण्यात आली असून, खोटे दावे, चुकीची बिले आणि बनावट माहितीवर प्रभावी नियंत्रण आले आहे. या प्रणालीमुळे २०२५ मध्ये साडेबारा कोटी रुपये आणि २०२६ मध्ये ९.२५ कोटी रुपयांचा दंड संबंधित कंत्राटदारांवर आकारण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील उर्वरित कामे पुढील एक-दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्याचबरोबर मुंबईच्या दीर्घकालीन पूरनियंत्रणासाठी एकात्मिक आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कनेक्टिंग लिंक प्रकल्प महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतिक**

कनेक्टिंग लिंक प्रकल्प हा केवळ वाहतूक प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतिक असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पात जगातील सर्वात रुंद बोगदा, भारतातील सर्वाधिक उंच व्हायाडक्ट आणि सर्वाधिक उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. अलीकडील अतिवृष्टीत जलवाहिनीचे नुकसान झाले असले तरी बोगदा आणि पुलाला कोणतीही संरचनात्मक हानी झाली नाही. आपत्कालीन यंत्रणांनी अवघ्या १८ तासांत वाहतूक पूर्ववत केली असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

**पारदर्शक प्रशासन आणि डिजिटल नियंत्रण**

मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा, एसएपी प्रणाली आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली लागू करण्यात आली आहे. शालेय साहित्य खरेदीत तसेच माहिती तंत्रज्ञान विभागातील निविदांमध्ये मोठी बचत झाली आहे. तसेच अवास्तव खर्चाच्या १,०३२ कोटी रुपयांच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत.

**जलसुरक्षेसाठी पाणी पुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण**

मुंबईच्या वाढत्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गारगाई प्रकल्पास आवश्यक वनमंजुरी मिळाली असून २०२९ पर्यंत ५०० एमएलडी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. मनोरी आणि वर्सोवा येथे डिसॅलिनेशन प्रकल्प उभारले जात असून २०३० पर्यंत एक हजार एमएलडी गोडे पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. एमएमआरच्या वाढत्या पाणी गरजा लक्षात घेऊन पाणी पुरवठा योजनेचे आधुनिकीकरण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**कॉँक्रीट रस्ते, बोगदे आणि पार्किंग प्रकल्पांना गती**

रस्त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी मुंबईतील ९५ टक्के रस्ते कॉँक्रीटीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यातील ८९ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यातील ७३ टक्के काम पूर्ण झाले असून मे २०२७ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. वाहतूक व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी गोरेगाव-मुलुंड बोगदा, उत्तर किनारी मार्ग, विविध उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल आणि ईस्ट-वेस्ट कनेक्टिव्हिटी प्रकल्प वेगाने पूर्ण केले जात आहेत. बहुमजली रोबोटिक पार्किंग आणि भूमिगत पार्किंग सुविधांनाही गती देण्यात येत आहे.

**घनकचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा**

घनकचरा व्यवस्थापनासाठी ६०० मेट्रिक टन क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असून त्यातून सुमारे ८ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. आरोग्य क्षेत्रात सायन रुग्णालय, नायर रुग्णालय तसेच उपनगरीय रुग्णालयांचा विस्तार करण्यात येत असून सुमारे तीन हजार अतिरिक्त रुग्णशय्या उपलब्ध होणार आहेत. सर्व रुग्णालयांचा डेटा एकत्रित करणारी एचएमआयएस प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

**स्वयंपुनर्विकासाला गती**

मुंबईतील पुनर्विकासाला गती देण्यासाठी स्वयं पुनर्विकास, म्हाडामार्फत समूह पुनर्विकास, क्लस्टर विकास आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. स्वयं पुनर्विकासामुळे ६०० चौरस फुटांच्या घराऐवजी १,२०० ते १,४०० चौरस फुटांपर्यंतची घरे नागरिकांना उपलब्ध होत आहेत. म्हाडाच्या विविध प्रकल्पांतून एक लाख आठ हजार सदनिका उभारल्या जाणार आहेत. धारावी पुनर्विकासातून सुमारे १ लाख ६० हजार निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक घटकांचे पुनर्वसन करण्यात येणार असून पात्र सर्व रहिवाशांना धारावीमध्येच घरे उपलब्ध करून दिली जातील.

**डिजिटल ट्विन, ई-टीडीआर आणि एआय आधारित मंजुरी**

मुंबई महानगरपालिकेत डिजिटल ट्विन प्रकल्प, एआय आधारित इमारत नकाशा मंजुरी प्रणाली, ई-टीडीआर एक्सचेंज, ऑनलाइन वित्तीय व्यवस्थापन आणि नागरिकांसाठी केंद्रीकृत तक्रार निवारण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. नव्या एआय प्रणालीमुळे ६० टक्के माहिती स्वयंचलितरीत्या उपलब्ध होणार असून मंजुरी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**२०४७ पर्यंत ८२५ अब्ज डॉलर्स जीडीपीचे उद्दिष्ट**

एमएमआरच्या भविष्यातील विकासाचा आराखडा मांडताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०४७ पर्यंत या प्रदेशाचा जीडीपी ८२५ बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. ३० नवीन बिझनेस हब, ३० परिवहन प्रकल्प, वॉटर मेट्रो, मेट्रो जाळ्याचा विस्तार, नवीन गृहनिर्माण प्रकल्प, एज्युसिटी, तिसरी आणि चौथी मुंबई यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

**सांस्कृतिक वारसा प्रकल्पांना प्राधान्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन पायाभूत सुविधांसह सांस्कृतिक वारसा प्रकल्पांनाही समान प्राधान्य देत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल आंतरराष्ट्रीय स्मारक प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तंत्रज्ञानाधारित अत्याधुनिक स्मारकाचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**विकास प्रकल्पांचे आर्थिक नियोजन**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा प्रमुख आधार असून सध्या सुरू असलेल्या आणि पुढील तीन वर्षांत विविध टप्प्यांत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांची एकूण किंमत १२ लाख २६ हजार ७०७ कोटी रुपये आहे. या सर्व प्रकल्पांचे आर्थिक नियोजन पूर्ण झाले असून कर्ज परतफेडीची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

**कांदळवन संरक्षणात वाढ**

कांदळवनांचे संरक्षण हे मुंबई आणि किनारपट्टीच्या पर्यावरणीय सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, अतिरिक्त कांदळवन लागवडीवर शासनाने सातत्याने भर दिला आहे. केंद्र शासनाच्या २०२१ च्या आकडेवारीनुसार राज्यातील कांदळवन क्षेत्र ३०२.७० चौरस किलोमीटरवरून ३१५.०९ चौरस किलोमीटरपर्यंत वाढले असून १२.३९ चौरस किलोमीटरची वाढ नोंदविण्यात आली आहे.

**सदस्यांच्या सूचनांवर सकारात्मक भूमिका**

विधानसभेतील चर्चेदरम्यान सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फनेल झोनच्या प्रश्नावर लवकरच बैठक घेऊन निर्णय केला जाईल. पीटीएस आणि पीएपी सदनिकांच्या मागणीसंदर्भात आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. अतिरिक्त ०.५ एफएसआयला मुदतवाढ देण्याच्या मागणीचाही सकारात्मक विचार करण्यात येईल. सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी सिंगल तिकीट प्रणालीच्या सूचनेवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चिता कॅम्प-कोळीवाडा मेट्रो जोडणीसंदर्भात मेट्रो २-बीच्या विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

**मुंबई 'ग्रोथ इंजिन'; रोजगार आणि गुंतवणुकीला चालना**

मुंबई आणि एमएमआर हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा 'ग्रोथ इंजिन' असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वाधिक पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) या भागात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून मुंबई देशाची फिनटेक राजधानी आणि स्टार्टअप हब म्हणून उदयास येत आहे. मुंबईबरोबरच पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि गडचिरोली पर्यंत विकासाची गती पोहोचविण्याचे शासनाचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सन्मानाचे घर, रोजगार आणि आधुनिक सुविधा देण्यास शासन कटिबद्ध राज्य शासनाची विकासाभिमुख भूमिका कायम असून सर्वसामान्यांना सन्मानाचे घर, अधिक रोजगाराच्या संधी, दर्जेदार नागरी सुविधा आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने कार्यरत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## नर्सिंग शिक्षणाचा विस्तार; नवीन व श्रेणीवर्धित बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयांना मंजुरी - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील आरोग्य व्यवस्थेसाठी कुशल परिचारिकांची उपलब्धता वाढविणे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयांमधून कमी शैक्षणिक शुल्कात दर्जेदार नर्सिंग शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने नर्सिंग शिक्षणाच्या व्यापक विस्ताराचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भातील निवेदन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत केले.

मंत्री मुश्रीफ म्हणाले की, राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार मुंबई (जी.टी.), मुंबई (सेंट जॉर्जेस), धुळे, सोलापूर, अंबाजोगाई (बीड), अकोला, नागपूर (आयजीएमसी) आणि सांगली येथील ८ शासकीय जी.एन.एम. महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करून तेथे प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेची शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यात येणार आहेत.

तसेच मुंबई (जे.जे.), नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नांदेड येथील विद्यमान ५ शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५० वरून १०० करण्यात येणार आहे. यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शासकीय संस्थांमध्ये नर्सिंग शिक्षणाची संधी उपलब्ध होईल.

याशिवाय चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग, रत्नागिरी, अमरावती, धाराशिव, गडचिरोली, पालघर आणि अहिल्यानगर येथे १० नवीन शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. उर्वरित ठाणे, सातारा, नाशिक, जालना, बुलढाणा, परभणी, हिंगोली, वाशिम, वर्धा आणि भंडारा या १० जिल्ह्यांमध्येही शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

या संपूर्ण प्रकल्पासाठी ४९१.९१ कोटी रुपयांच्या अनावर्ती खर्चास तसेच वार्षिक १२.५८ कोटी रुपयांच्या आवर्ती खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील नर्सिंग शिक्षणाची क्षमता लक्षणीय वाढणार असून, प्रशिक्षित परिचारिकांची उपलब्धता वाढून शासकीय आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि नागरिकाभिमुख होण्यास मोठी मदत होणार असल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

## संगमनेर पाणीपुरवठा योजनेतील निविदा प्रक्रियेची चौकशी करणार -राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई (प्रतिनिधी) : संगमनेर नगर पालिकेमार्फत केंद्र पुरस्कृत सुधारित पाणीपुरवठा योजनेतील निविदा प्रक्रियेत नियमांचे पूर्ण पालन झाले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असून, या प्रकरणाची चौकशी करून निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना दिली. विधानसभा सदस्य अमोल खताळ यांनी यासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री मिसाळ बोलत होत्या. राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, केंद्र पुरस्कृत लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सुविधांच्या विकास योजनेंतर्गत संगमनेर नगरपालिकेमार्फत ८.७८ कोटी रुपयांच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आले. याच्या निविदा प्रक्रियेपूर्वी अंदाजपत्रकात निदर्शनास आलेल्या त्रुटीनुसार नगरपरिषदेमार्फत बदल करून ९.२९ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आली होती, असे नगरपरिषदेने कळवले आहे. मात्र, मोठ्या प्रकल्पांच्या निविदा निश्चित करताना शासनाच्या प्रचलित नियम व निकषांचे पालन होणे आवश्यक असताना या प्रकरणात त्याचे पालन झाले नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

त्यामुळे नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत सखोल चौकशी करून त्यातील निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्यात येणार असल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले.

## शेतीची शासकीय मोजणी म्हणजे शेतीच्या मालकीची शाश्वती - संजय मोरे पाटील



**जालना - प्रतिनिधी**

''शेतीची शासकीय मोजणी म्हणजे शेतीच्या मालकीची शाश्वती'' असते असे मत ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी व्यक्त केले. नळविहिरा, ता. जाफराबाद ( जि. जालना ) येथे गुरुवार ( दि. ९ जुलै ) रोजी झालेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या नियमित मासिक चर्चासत्र कार्यक्रमात मोरे पाटील बोलत होते.

शेतकऱ्यांना शासकीय जमीन मोजणीचे महत्त्व पटवून देतांना ते म्हणाले की, शेतजमिनीची अधिकृत शासकीय मोजणी ही केवळ सीमारेषा निश्चित करण्याची प्रक्रिया नसून ती शेतकऱ्यांच्या मालकी हक्काला कायदेशीर बळ देणारी महत्त्वाची बाब आहे. अनेक ठिकाणी सीमावाद, अतिक्रमण, वारसाहक्काचे वाद, खरेदी-विक्रीतील अडचणी आणि न्यायालयीन प्रकरणे केवळ अचूक मोजणी नसल्यामुळे निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने वेळेत आपल्या जमिनीची शासकीय मोजणी करून घेणे आवश्यक आहे.

मोरे पाटील यांनी पुढे सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे आज शासकीय मोजणी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने केली जाते. जमिनीची नोंद, सातबारा, फेरफार, बँक कर्ज, सिंचन योजना, पीक विमा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना अधिकृत मोजणी अत्यंत उपयुक्त ठरते. भविष्यात आपल्या वारसांना कोणताही वाद न होता जमीन हस्तांतरित व्हावी, यासाठी शासकीय मोजणी ही काळाची गरज आहे. यावेळी त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आवाहन केले की, ''शेताची शासकीय मोजणी हा खर्च नसून आपल्या पिढ्यानपिढ्यांच्या मालकी हक्काचे संरक्षण करणारी सुरक्षित गुंतवणूक आहे. प्रत्येक शेतकऱ्याने शासकीय मोजणी करून आपल्या मालकीची शाश्वती निश्चित केली पाहिजे.''

या मार्गदर्शनपर विषयास उपस्थित शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी विठ्ठल खपुटे, अनिल जाधव, विष्णू जाधव, संपत जंजाळ, नारायण मेमटे, शिवाजी मोरे, गजानन मेमटे, राजेंद्र मेमटे, किशोर जंजाळ, शरद पाचरणे, भगवान खपुटे, डीगांबर खपुटे, विनोद मोरे, राजु म्हस्के, शंकर म्हस्के, विष्णू म्हस्के, मोबीन शेख, सलीम शेख सह अन्य उपस्थित होते.

### *नमन, जाखडी, वही गायन आणि झाडीपट्टी लोककलांचाही अनुदान योजनेत समावेश - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार*

## दशावतारासह लोककला अनुदान दुप्पट; कलाकारांच्या खात्यावर थेट अनुदान जमा होणार

**मुंबई - प्रतिनिधी**

विद्यमान लोककला अनुदान योजनेत नमन खेळ, जाखडी, वही गायन आणि झाडीपट्टी या चार लोककला प्रकारांचाही समावेश करण्यात येणार आहे. या प्रत्येक लोककला प्रकारातील २० कलापथकांना प्रत्येकी ५० हजार रुपये या प्रमाणे वार्षिक १० लाख रुपयांचे अनुदान देण्यात येईल. राज्यातील दशावतार ही केवळ लोककला नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि पारंपरिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. या कलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी दशावतारासह लोककला अनुदानाची रक्कम २ कोटी २२ लाख रुपयांवरून ४ कोटी ४० लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून कलाकारांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना केली.

विधानसभा सदस्य निलेश राणे यांनी दशावतारी कलाकारांच्या विविध समस्यांसंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली असता मंत्री ॲड.शेलार यांनी ही घोषणा केली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, सुनील प्रभू यांनीही सहभाग घेतला.

मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, कोकणातील दशावतार कलेने राज्यासह देश-विदेशात महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. या कलेसाठी कार्यरत असलेल्या कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत राज्यस्तरीय समितीचा विस्तार करण्यात आला असून देवेंद्र नाईक, दत्ताप्रसाद शेणई, संतोष रेडकर, राजाराम धुरी आणि शरद मोचेमाडकर यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले की, १ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार पूर्णवेळ तमाशा, हंगामी तमाशा, दशावतार, खडी गंमत तसेच शाहिरी व संगीत बारी या लोककलांना भांडवली व प्रयोगात्मक अनुदान दिले जाते. मात्र अनुदानाचा लाभ कलाकारांपर्यंत थेट पोहोचावा, यासाठी नव्या निर्णयानुसार वाढीव निधीपैकी निम्मी रक्कम कलाकारांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल, तर उर्वरित रक्कम कलापथक चालकांना देण्यात येईल. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील १५ दिवसांत निर्गमित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दशावतार कलाकारांची नोंदणी, जिल्हास्तरावर प्रत्यक्ष पडताळणी तसेच लोककलावंतांना ओळखपत्र देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. यासाठी विभागीय अधिकारी जिल्हास्तरावर जाऊन नोंदणी प्रक्रिया राबवतील, असे त्यांनी सांगितले.

दशावतार महोत्सव, नमन महोत्सव तसेच राज्य सांस्कृतिक पुरस्कार योजनेंतर्गत दशावतार कलेसाठी तीन लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार आणि एक लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक युवा पुरस्कार देण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

राज्यातील भारूड, शंकासूर आणि शक्तीतुरा या लोककलांचे महोत्सव राज्यातील प्रत्येक विभागात आयोजित करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. तसेच कोकणासह राज्यातील भजनी मंडळांना भांडवली साहित्य खरेदीसाठी सुरू असलेली अनुदान योजना अधिक व्यापक करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

देव खेळ या वेब सिरीजमध्ये लोकपरंपरेचा विपर्यास झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित वेब सिरीजविरोधात पोलिस कारवाई करण्याचे तसेच केंद्र शासनालाही याबाबत कळविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली. याशिवाय, राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलाकार मानधन योजनेत पात्र दशावतार कलाकारांचा समावेश करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांमार्फत कार्यवाही करण्यात येईल. भजनी कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

# ग्रामीण रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता : कामे न करता देयक अदा

## माजी आमदार कैलास गोरंटयाल यांचा गंभीर आरोप ✻ मुख्यमंत्र्यांकडे केली चौकशीची मागणी

**जालना -प्रतिनीधी**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जालना तालुक्यात मंजूर करण्यात आलेल्या ग्रामीण व जिल्हा रस्त्यांच्या मोठया प्रमाणावर अनियमितता झाली असून प्रत्यक्ष कामे न करता बोगस देयके अदा करून शासकीय निधीची झालेल्या अपहाराची सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा लाचलुचपत विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



या निवेदनात गोरंटयाल यांनी म्हटले आहे की, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२१ ते २०२५ आणि २०२५ -२६ या वर्षात जालना तालुक्यात लेखाशिर्ष ३०५४ मधून ग्रामीण रस्ते व ५०५४ मधून जिल्हा रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहे.या मंजुर करण्यात आलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली असून प्रत्यक्ष कामे न करता अथवा अपूर्ण कामे करून बोगस मोजमाप पुस्तिका (), खोटी पूर्णता प्रमाणपत्रे व बोगस देयके तयार करून शासकीय निधीचा अपहार झाला आहे.यासंदर्भात जालना तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून आपल्याकडे अनेक लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच इंदेवाडी ते सिरसवाडी रस्ता, बाजीउम्रद ते निरखेडा रस्ता, मोतीगव्हाण येथील रस्ता, निरखेडा ते मोजपुरी, धनेगाव रसत्याच्या तक्रारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे त्या त्या गावातील प्रमुख कार्यकर्त्यांनी केल्या आहेत. जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ अंतर्गत लेखाशीर्ष ३०५४/ ५०५४ मधून मंजूर करण्यात आलेल्या रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण करणे, पुले, मजबुतीकरण व सुधारणा करणे कामांपैकी अनेक कामे प्रत्यक्षात पूर्ण करण्यात आलेली नाहीत किंवा अपूर्ण स्वरूपात करण्यात आली असून, थातुर मातुर मुरूम टाकलेला आहे तर काही प्रकरणांमध्ये कामे पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवून बोगस मोजमाप पुस्तिका (), खोटी पूर्णता प्रमाणपत्रे व बोगस देयके तयार करून शासकीय निधीचा अपहार झाल्याची गंभीर शंका व्यक्त करण्यात आली आहे. तक्रारदारांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, अशा प्रकारच्या अनियमिततेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असून, अनेक कामांबाबत प्रत्यक्ष स्थळावरील परिस्थिती व शासकीय अभिलेख यामध्ये मोठी विसंगती असल्याचा दावा तक्रारींमध्ये करण्यात आला आहे. काही प्रकरणांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागविलेली माहितीही वेळेत किंवा पूर्ण स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली नसल्याची बाबही निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरण सार्वजनिक निधीशी संबंधित असून जनतेच्या करातून उपलब्ध झालेल्या निधीचा वापर पारदर्शक व नियमानुसार होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे या तक्रारींकडे अत्यंत गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. याशिवाय, संबंधित कामांची अंमलबजावणी, मोजमाप व देयक प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत झालेली असल्याने त्याच यंत्रणेमार्फत चौकशी झाल्यास चौकशीच्या निष्पक्षतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार तसेच हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी होणे आवश्यक आहे. सन २०२१ ते २०२५ या पाच वर्षाच्या कालावधीत जालना तालुक्यात लेखाशीर्ष ३०५४/५०५४ अंतर्गत मंजूर झालेल्या सर्व कामांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी,प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मंजूर कामे व प्रत्यक्ष झालेले काम यांची पडताळणी करण्यात यावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत संशयित कामांची प्रलंबित देयके स्थगित करण्यात यावीत, चौकशीत अनियमितता अथवा आर्थिक गैरव्यवहार आढळल्यास संबंधित अधिकारी अभियंते, कर्मचारी व कंत्राटदारांविरुद्ध नियमानुसार प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी,

चौकशी अहवाल शासनास सादर करून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, सदर प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून शासनाच्या विकास कामांवरील जनतेचा विश्वास अबाधित राहण्यासाठी स्वतंत्र,निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या या निवेदनात केली असून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी जालना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही स्वतंत्रपणे निवेदन देण्यात आले आहे.

**सा.बां.विभाग अथवा लाचलुचपत विभागामार्फत चौकशीची मागणी**

या सर्व कामांची चौकशी ही जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांमार्फत न करता सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित करून त्यांच्यामार्फत करावी किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत करावी,

आवश्यक असल्यास गुणवत्ता नियंत्रण विभाग, वित्तीय विभाग व इतर स्वतंत्र तांत्रिक तज्ज्ञांचा समितीत समावेश करून सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिका,प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कार्यारंभ आदेश, देयक बिले, पूर्णतः प्रमाणपत्रे व संबंधित अभिलेखांची सखोल तपासणी करावी, अशी मागणीही माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केली आहे..

---

## माजी आमदारांचे आरोप हास्यास्पद

# ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले- आ. अर्जुनराव खोतकर

**जालना - प्रतिनिधी**

जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील गैरव्यवहारामुळे अडचणीत आलेल्या शेकडो सभासद, ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. राज्याच्या चालू अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार ठेवीदारांना त्यांची रक्कम मिळण्यासाठी प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आश्वासन शासनाने दिले आणि त्यानुसार पुढील कार्यवाहीही करण्यात आली, असा खुलासा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केला.



आमदार खोतकर

म्हणाले की, शासनाने आवश्यक सूचना केल्यानंतर रिझर्व्ह बँकेमार्फत जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचा सुमारे ९३ कोटी ३६ लाख रुपयांचा विमा प्रस्ताव मंजूर झाला. त्यामुळे ठेवीदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. हा निर्णय हजारो ठेवीदारांसाठी दिलासादायक असून, त्यासाठी आपण सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे हे फलित आहे.

याच पार्श्वभूमीवर माजी आमदारांनी केलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे, दिशाभूल करणारे आणि हास्यास्पद आहेत. श्रेयवादाचे राजकारण करणे हा आमचा स्वभाव नाही. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविणे हेच आमचे कर्तव्य असून, त्यातूनच आम्हाला समाधान मिळते. त्यामुळे अशा निराधार आरोपांना कोणतेही महत्त्व नाही.

बँकेतील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळापासूनच आपण ठेवीदार, सभासद आणि खातेदारांच्या बाजूने ठामपणे उभे राहिलो. त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळावेत, यासाठी शासन, संबंधित विभाग आणि विविध पातळ्यांवर सातत्याने पाठपुरावा केला. ही बाब जालना जिल्ह्यातील जनतेला चांगलीच माहीत आहे. (पान २ वर)

---

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

जालना (जिमाका) : परतुर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ (शनिवार) साठी अर्ज हे ऑनलाईन पद्धतीने भरले जात असुन जालना जिल्हयातील रहीवासी असलेल्या व इयत्ता पाचवी वर्गात सन २०२६-२७ मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांनी त्यांची नोंदणी सेवा केंद्रावरून व ईतर यंत्रणेचा वापर करून ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे सदर अर्ज भरण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०२६ अशी आहे.

तरी जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी-२०२७ साठी च्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी पाचवीच्या विद्यार्थ्यांनी स्वतःची स्वाक्षरी, वडिलांची स्वाक्षरी, विद्यार्थ्यांचा फोटो, जातीचे प्रमाणपत्र व आधारकार्ड सोबत असणे आवश्यक आहे. ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठीची जाहीरात, माहीतीपत्रक, इ हे खालील दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. फॉर्म भरण्यासाठीचे प्रमाणपत्रे, फोटो, स्वाक्ष-या इ हे १० (पान २ वर)

---

# जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत विकासकामांच्या प्रगती आढावा बैठक संपन्न

**जालना -प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२६-२७ मधील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आढावा बैठक पार पडली.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी राज्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने कामकाज करण्याच्या सूचना दिल्या. सन २०२५-२६ आणि त्यापूर्वीच्या वर्षांतील विभागनिहाय मंजूर निधी, त्यातील खर्च, तसेच सन २०२३-२४ व त्यानंतरच्या वर्षांतील खर्च न झालेल्या निधीबाबत कारणांसह सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले. यावेळी सन २०२५-२६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेल्या मात्र प्रत्यक्षात काम सुरू न झालेल्या सर्व योजनांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. अशा कामांची सद्यस्थिती, काम सुरू होण्यास झालेला विलंब आणि ती कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीत पालकमंत्री यांनी दिलेल्या सूचनांनुसार कोणकोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याचा आढावा ही बैठकीत सादर घेण्यात आला. प्रत्येक विभागाने शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी दिले.

सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा विकास आराखडा, गतिमान प्रशासन, व्यक्तिमत्त्व विकास, जिल्हा विकास आराखडा (महसूल व भांडवली) तसेच शाश्वत विकास ध्येय () अंतर्गत प्रस्तावित योजनांवरही सविस्तर चर्चा झाली. या योजनांचे प्रस्ताव वेळेत सादर करून विकासकामांना गती देण्याचे आवाहन करण्यात आले.

याशिवाय जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत सन २०२६-२७ मध्ये हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सन २०२५-२६ मध्ये झालेल्या निधी खर्चाचा आढावा घेऊन खर्चाची गती वाढविण्यावर भर देण्यात (पान २ वर)

---

# किड्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेऊ नये; गटशिक्षण अधिकाऱ्यांचे अधिकृत पत्र, शाळेला मान्यता नसल्याचा स्पष्ट उल्लेख

## *किड्स इंग्लिश स्कूलबाबत शिक्षण विभागाचा इशारा; प्रवेशापूर्वी गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन*

**परतूर -प्रतिनिधी**

परतूर येथील किड्स इंग्लिश स्कूल संदर्भात गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्रामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सदर पत्रामध्ये किड्स इंग्लिश स्कूलला मान्यता नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले असून, ''या शाळेत प्रवेश घेऊ नये'' अशा स्पष्ट सूचना पालकांना देण्यात आल्या आहेत. तसेच, प्रवेशाबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.




गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, संबंधित शाळेला आवश्यक शासकीय मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि पालकांची दिशाभूल टाळण्यासाठी हा इशारा देण्यात आल्याचे पत्रातून स्पष्ट होते. या पत्रानंतर संबंधित शाळेसमोर ''किड्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेऊ नये'' असा फलकही लावण्यात आला आहे. त्यामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक जण शिक्षण विभागाकडून अधिकृत माहिती घेत असल्याचे समजते.

शिक्षण विभागाने पालकांना कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी त्या शाळेची शासनमान्यता तपासूनच प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः किड्स इंग्लिश स्कूल संदर्भात जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राची दखल घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

---

# आ. लोणीकरांच्या प्रयत्नामुळे परतूर शहराचा पाणीपुरवठा झाला सुरळीत

**परतूर - प्रतिनिधी**

फुटलेली जलवाहिनी दुरुस्त करण्यास मोठा विलंब लागत असल्याने शहरात मागील दहा -बारा दिवसांपासून नळाला पाणी येत नव्हते. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी नाराजी पसरली होती. पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. मात्र पाणीपुरवठा सुरळीत होत नव्हता.शेवटी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी ही बाब आ. बबनराव लोणीकर यांच्या कानावर घातली आणि दुसऱ्याच दिवशी शहराचा पाणीपुरवठा सुरळीत झाला हे विशेष. शहराला पाणीपुरवठा करणारी बसस्थानकाजवळील जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. दोन दिवसात फुटलेल्या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते.

मात्र पालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे हे काम लवकर होऊ शकले नाही. त्यामुळे शहरात दहा-बरा दिवस पाणीपुरवठा होऊ शकला नाही. भर पावसाळ्यात नळांना पाणी येत नसल्याने नागरिक आणि विशेष म्हणजे महिला वर्ग कमालीचा त्रस्त झाला होता. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी फोन करून शहरात मागील दहा-बारा दिवसांपासून पाणीपुरवठा होत नसल्याबाबत कळविले. आ. लोणीकर यांनी तातडीने पालिकेच्या मुख्याधिऱ्यांना कुठल्याही परिस्थितीत शहराचा पाणीपुरवठा दोन दिवसात सुरळीत झाला पाहिजे अशी सूचना केली. त्यानंतर या कामाला खऱ्या अर्थाने गती आली आणि नळाला पाणीही आले.

---

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्ती आदेशांचे वितरण

## व उत्कृष्ट उद्योजक, कौशल्य प्रशिक्षण संस्था आणि आस्थापनांचा सन्मान

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्तश्री. गणेश चिमणकर, सहायक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कौशल्य सप्ताह (दि. ७ ते १५ जुलै २०२६)अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना यांच्या वतीनेमुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्ती आदेशांचे वितरण तसेच उत्कृष्ट उद्योजक, कौशल्य प्रशिक्षण संस्था आणि युवकांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या आस्थापनांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्यामुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचाउद्देश सुशिक्षित युवक-युवतींना उद्योग व सेवा क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभव देणे, त्यांचे व्यावसायिक कौशल्य विकसित करणे आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी अधिक सक्षम (पान २ वर)



आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र सावखेडा (ता. भोकरदन, जि. जालना) येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे जालना शहरात भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी सपत्नीक संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पालखीची विधिवत आरती करून दर्शन घेतले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.